# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 12.09.2026** **वार : शनिवार**

1. 18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेला आजपासून नवी दिल्लीत प्रारंभ
2. ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांच्या जागतिक नेत्यांशी द्विपक्षीय बैठका
3. जागतिक अस्थिरतेच्या काळात भारत विकास आणि स्थैर्याबाबतच्या विश्वासाचा स्रोत ठरत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
4. कनिष्ठ गटातील आशिया हॉकी चषक स्पर्धेत भारतीय पुरुष संघाची अंतिम फेरीत धडक आणि
5. महिलांच्या आशिया चषक टी 20 क्रिकेट स्पर्धेत उद्या भारताचा सामना गतविजेत्या श्रीलंकेशी

**<u>ब्रिक्स-परिषद</u>**

नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' इथं आजपासून 18 वी ब्रिक्स शिखर परिषद सुरू होत आहे. भारतासह ब्राझील, चीन, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका आणि संयुक्त अरब अमिराती अशा अकरा देशांचे प्रमुख नेते आणि प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या उच्च-स्तरीय शिखर परिषदेदरम्यान, जागतिक प्रशासन, बहुपक्षीयता, व्यापार आणि गुंतवणूक, तंत्रज्ञान, अन्न आणि ऊर्जा सुरक्षा, आरोग्यसेवा, आपत्ती-सक्षमता आणि महत्त्वपूर्ण पुरवठा साखळ्या यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. भारताच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या परिषदेची संकल्पना 'अनुकूलन, नाविन्य, सहकार्य आणि शाश्वतता याची उभारणी' अशी आहे.

**<u>ब्रिक्स-बैठका</u>**

18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली इथं रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन, इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान आणि संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्याबरोबर द्विपक्षीय बैठका घेतल्या. राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत, दोन्ही नेत्यांनी राजकारण, व्यापार आणि अर्थव्यवस्था, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, कौशल्य-आधारित मनुष्यबळ देवणघेवाण आणि जनसंपर्क यांसारख्या विविध क्षेत्रांमधील भारत-रशिया सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. पश्चिम आशिया आणि काळा समुद्र क्षेत्रातील संघर्षांसह परस्पर हिताच्या प्रमुख प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. संघर्ष सोडवण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरी हाच योग्य मार्ग असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केलं आणि शांततेच्या प्रयत्नांमध्ये मदत करण्यास भारत सज्ज असल्याचे सांगितलं.

इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याबरोबरच्या बैठकीत, पंतप्रधान मोदी यांनी द्विपक्षीय संबंध आणि पश्चिम आशियातील अलीकडील घडामोडींवर चर्चा केली. सर्व मुद्दे संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारेच सोडवले जावेत, या भारताच्या सातत्यपूर्ण भूमिकेचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. या प्रदेशात कायमस्वरूपी शांतता आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचं मोदी म्हणाले. जलवाहतूक, व्यापाराचं स्वातंत्र्य आणि खलाशांची सुरक्षा सुनिश्चित करणं आवश्यक आहे असं ते म्हणाले. पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांचीही भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी, जागतिक संघर्ष, जलवाहतूक स्वातंत्र्य, शाश्वत विकास, अक्षय ऊर्जा, जागतिक अन्न

सुरक्षा आणि मानवकेंद्रित कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांवर चर्चा केली. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेसह आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

**ब्रिक्स बिझनेस फोरम**

जागतिक अस्थिरतेच्या काळात भारत विकास आणि स्थैर्याबाबतच्या विश्वासाचा स्रोत ठरत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल नवी दिल्लीत ब्रिक्स व्यवसाय परिषदेत बोलत होते. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले....

**आज जब दुनिया में trade barriers बढ़ रहे हैं, भारत economic bridges बना रहा है। 2014 के बाद से हमने दुनिया के करीब 40 countries के साथ फ्री ट्रेड एग्रीमेंट्स किए हैं। BRICS में भी हमारी approach यही है, barriers को कम करना, और businesses के लिए अवसर बढ़ाना।**

ब्रिक्स देश नवोन्मेष आणि पर्यायांचं महत्त्वाचं जागतिक केंद्र म्हणून उदयाला येत आहेत. जागतिक जीडीपी अडीच टक्क्यांनी वाढत असताना ब्रिक्सचा जीडीपी साडेचार टक्क्यांनी वाढत असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी नमूद केलं. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, यांच्यासह विविध देशांचे राष्ट्राध्यक्ष आणि वरिष्ठ मंत्री, तसंच केंद्रिय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**ASSOCHAM**

जागतिक सहकार्यासाठी एक शक्तिशाली व्यासपीठ आणि ग्लोबल साउथचा एक मजबूत आवाज म्हणून ब्रिक्स संघटना मजबूत करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीचं ASSOCHAM अर्थात असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडियानं कौतुक केलं आहे. ब्रिक्स सहकार्याचं ठोस व्यावसायिक परिणामांमध्ये रूपांतर करण्याची पंतप्रधानांची दूरदृष्टी अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचं ASSOCHAM चे अध्यक्ष निर्मल के. मिंडा यांनी म्हटलं आहे.

**सीतारामन ग्लोबल फिनटेक**

भारतातली युवा पिढी संधीची वाट न पाहता स्वतःच उद्योग व्यवसाय आणि नवे पर्याय निर्माण करत आहे असं मत केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केलं. त्या काल मुंबईत ग्लोबल फिनटेक महोत्सवात बोलत होत्या. आपण मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानातील नवोन्मेषाचा स्वीकार केला पाहिजे मात्र त्यासाठी मानवी जबाबदारी, सुरक्षा आणि लोकांच्या विश्वासाशी तडजोड करू नये असं सीतारामन म्हणाल्या.

**गडकरी**

तंत्रज्ञान आधारित पथकर प्रणालीमुळे राष्ट्रीय महामार्गावरुन वाहतूक करणाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल, वेळेची बचत होईल आणि एकंदर प्रवासाचा अनुभव चांगला होईल असा विश्वास केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये फास्टॅग पोर्टेबिलिटीसाठीच्या वन टॅग या सुविधेचं उद्घाटन काल गडकरी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. या सुविधेमुळे वाहन मालकांना सध्याचा फास्टॅग राजमार्ग यात्रा ॲपच्या सहाय्याने नवीन बँक खात्याशी जोडता येईल. बँक खाते बदलल्यास फास्टॅग बदलण्याची आता गरज नाही.

**मांडवीय**

श्रमशक्ती हा एखाद्या देशाच्या विकासाचा अविभाज्य भाग असून राष्ट्र उभारणीत श्रमशक्तीचं योगदान महत्त्वाचं आहे असं केंद्रिय श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. इमारत आणि अन्य बांधकाम

कामगारांच्या राष्ट्रीय परिषदेत ते काल मुंबईत बोलत होते. कामगारांची सुरक्षा आणि कल्याण हा देशाच्या विकासाचा पाया आहे असं मांडवीय यावेळी म्हणाले. सर्व कामगारांची आणि आस्थापनांची नोंदणी होण्याची तसंच सेस करातून मिळालेल्या निधीचा परिणामकारक उपयोग होण्याची गरज आहे असं श्रम आणि रोजगार राज्यमंत्री शोभा कारंदलजे परिषदेच्या समारोपप्रसंगी म्हणाल्या.

## किसान मानधन योजना

प्रधानमंत्री किसान मानधन योजनेला आज सात वर्षे पूर्ण होत आहेत. अल्प आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या उद्देशाने 12 सप्टेंबर 2019 रोजी ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत, पात्र शेतकऱ्यांना वयाच्या 60 व्या वर्षापासून किमान तीन हजार रुपये मासिक निवृत्तीवेतनाची हमी देण्यात येते, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या वृद्धापकाळात आर्थिक सन्मान स्थिरता प्राप्त होते.

## निधन

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, राजकीय विश्लेषक आणि काँग्रेसचे माजी प्रवक्ते डॉ. रत्नाकर महाजन यांचं कालरात्री पुण्यात निधन झालं. ते 80 वर्षांचे होते. राज्य नियोजन मंडळाचे माजी कार्यकारी अध्यक्ष आणि लोकबोधिनीसंस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केलं. युवक क्रांती दल आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्याकार्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलं. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी पुण्यातीलवैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## हॉकी-कनिष्ठ

चीनमध्ये सुरू असलेल्या कनिष्ठ गटातील आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या पुरुष गटात मलेशियाचा 3-1 असा पराभव करून भारतीय संघानं अंतिम फेरीत प्रवेश केला. उद्या होणाऱ्या अंतिम फेरीत भारताचा सामना दक्षिण कोरियाशी होईल. महिलांच्या कनिष्ठ गटातील आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीत भारताचा सामना दक्षिण कोरियाशी होत आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी पावणे दहा वाजता सुरू होणार आहे. गतविजेत्या भारतानं उपांत्यपूर्व सामन्यात पाकिस्तानचा 19-0 असा धुव्वा उडवत उपांत्य फेरीत धडक मारली. तीन दणदणीत विजय आणि एका बरोबरीसह 10 गुण मिळवून भारतानं 'एलिट पूल ए' मध्ये अव्वल स्थान पटकावलं. दुसऱ्या उपांत्य सामन्यात, यजमान चीन आणि जपान यांच्यात लढत होईल.

## महिला क्रिकेट

महिला क्रिकेटमध्ये, दुबई इथं उद्या होणाऱ्या टी-20 आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताचा सामना गतविजेत्या श्रीलंकेशी होणार आहे. काल रात्री पाकिस्तानचा चार गडी राखून पराभव करत श्रीलंकेनं अंतिम फेरीत धडक मारली. सात वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या भारतानं साखळी फेरीत अव्वल स्थान गाठलं होतं तर उपांत्य फेरीत बांगलादेशचा 40 धावांनी पराभव केला होता. 2024 च्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात श्रीलंकेनं भारताचा पराभव करून आपलं पहिलं आशिया चषक विजेतेपद पटकावले होतं.

## हवामान

आंध्रप्रदेशमधील किनारपट्टी भागात वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. उत्तराखंड, गुजरात, कोकण, गोवा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्येही मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**